# अंबरनाथ नगरपरिषद - सायकल स्पर्धा

अंबरनाथ नगरपरिषद आणि महिला बालकल्याण समितीच्या वतीने आयोजित दि.२४/०८/२०१८ रोजी झालेल्या सायकल स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नगराध्यक्षा मनीषा वाळेकर यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महिला बालकल्याण समिती सभापती रेश्मा काळे, उपसभापती सुप्रिया देसाई, पाणीपुरवठा सभापती संदिप भराडे, आरोग्य सभापती शशांक गायकवाड, मागासवर्गीय समिती सभापती सारिका शिंगवे, माजी नगराध्यक्ष सुनील चौधरी तसेच नगरपरिषदेचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

अंबरनाथमधील बी केबीन रोड, राहुलनगर ते मोरीवली पाडा ते पुन्हा राहुलनगर या मार्गावर ही स्पर्धा घेण्यांत आली. १४ वर्षाखालील मुले-मुली, १७ वर्षावरील मुली तसेच महिला खुला गट अशा वेगवेगळ्या गटांत ही स्पर्धा झाली. सुमारे ३८० महिलांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात मुलांमध्ये शाहिद शेख, मुलींमध्ये साक्षी भालेराव, १७ वर्षाखालील मुलींच्या गटात जुई सावंत तर खुल्या गटात गीतांजली गायकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

# अंनप चे डॉ.बी.जी.छाया रुग्णालय शासनाकडे हस्तांतरीत

अंबरनाथ नगरपरिषदेचे डॉ.बी.जी.छाया रुग्णालय ऑक्टोबर २०१६ मध्ये शासनाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळात घेण्यात आला होता. सदर रुग्णालय शासनाकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया दि.२ ऑगस्ट २०१८ रोजी पूर्ण करण्यांत आली. हस्तांतरण प्रक्रियेच्या वेळेस मुख्याधिकारी देवीदास पवार, नगराध्यक्षा मनिषा वाळेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कैलास पवार आदि उपस्थित होते.

डॉ.बी.जी.छाया रुग्णालयाला शासनाने उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देऊन त्यासाठी ४८ विविध पदांनाही मंजूरी दिली आहे. त्यामुळे आता हे रुग्णालय ५० खाटांचे असणार असून या रुग्णालयात रुग्णांना अद्ययावत सुविधांसह उपचार उपलब्ध होणार आहेत.